दै. गोदातीर - 10/11/2023

# महिलांचे दागिने लुटणारे दोघेजण अटकेत

## ▶ लिंबगाव आणि धर्माबाद पोलिसांचीही कारवाई
## ▶ पोलीस अधीक्षक श्रीकृष्ण कोकाटे यांची माहिती



**नांदेड-** शहराच्या भाग्यनगर पोलीस ठाण्याच्या हद्दीत लगातार दोन दिवस चैन स्नचींगच्या घटना घडल्यानंतर पोलीस निरीक्षक सूर्यमोहन बोलमवाड व त्यांच्या टीमने जोखीम पत्करत दोन आरोपींना पाठलाग करून पकडले. त्यांच्याकडून गुन्ह्यात वापरलेल्या दोन बुलेट आणि सोन्याचे दागिने जप्त केले. या सोबतच लिंबगावचे सहाय्यक पोलीस निरीक्षक चंद्रकांत पवार आणि धर्माबादचे पोलीस निरीक्षक अभिषेक शिंदे यांनीही गुन्हेगारांना अटक केली, अशी माहिती पोलीस अधीक्षक श्रीकृष्ण कोकाटे यांनी गुरुवारी पत्रकार परिषदेत दिली.

शहराच्या भाग्यनगर पोलीस ठाण्याच्या हद्दीत सहा नोव्हेंबर आणि सात नोव्हेंबर या दोन दिवशी लगातार बुलेट दुचाकीवरून येऊन संशयित चोरट्यांनी दोन महिलांना गाठून त्यांच्या गळ्यातील दागिने लंपास केले होते. त्यानंतर संशयास्पद फिरणाऱ्या बुलेटवरील दोघांना पोलिसांनी ताब्यात घेतले. पोलिसांनी तौफिकखान आयुब खान (वय २४ रा.बिलाल नगर देगलूर नाका) आणि सलमानखान असलमखान (वय २८ रा.अदनान गार्डन धनेगाव नांदेड) या दोघांना अटक केली. त्यांनी भाग्यनगर हद्दीत चार, शिवाजीनगर आणि नांदेड ग्रामीण ठाण्याच्या हद्दीत प्रत्येकी एकेक गुन्हा असे सहा गुन्हे केल्याची कबुली दिली. पोलिसांनी त्यांच्याकडून दोन्ही बुलेट जप्त केल्या असून एक बुलेट तेलंगणा राज्यातील आहे. असा एकूण चार लाख ५० हजार रुपयाचा मुद्देमाल ज्यात ४९ ग्राम सोन्याचे दागिन्यांचा समावेश आहे.

यासोबतच लिंबगाव ठाण्याचे सहाय्यक पोलीस निरीक्षक चंद्रकांत पवार यांनीही त्यांच्याकडे दाखल असलेल्या जबरी चोरीचा गुन्हा उघडकीस आणला. ऊस तोडीसाठी मजूर पुरवितो तो म्हणून आणि आमच्याकडे सोन्याचे शिक्के आहेत ते कमी किमतीत द्यायचे अशी बतावणी करून लिंबगाव ठाण्याच्या हद्दीतील वरखेड या गाव शिवारात बोलावून एकाकडून दहा लाख रुपये पळवले होते. यात अर्जुन शिंदे रा. उमरी, राहुल पवार रा. मुदखेड, अनिल मारकुळे रा. वसमत, सुरेश पवार रा. वसमत, पिऱ्या गिरे, किशन गोरे, लखन एरंडले आणि सोन्या काळे यांची नावे या गुन्ह्यात निष्पन्न करण्यात आली. पोलिसांनी अनिल रंगनाथ मारकुळे राहणार वसमत याला अटक करून त्याच्याकडून गुन्ह्यातील दुचाकी आणि चाळीस हजार रुपये जप्त करण्यात आले आहे.

यासोबतच धर्माबाद पोलिसांनी एका आरोपीला अटक करून त्याच्याकडून दोन लाख ३५ हजार रुपये किंमतीच्या तीन दुचाकी जप्त केल्या आहेत. ही कारवाई पोलीस निरीक्षक अभिषेक शिंदे आणि त्यांच्या टीमने धर्माबाद शहरात केली. शहराच्या शिक्षक कॉलनी परिसरात संशयास्पद फिरणार्या दुचाकी चोरट्याला ताब्यात घेऊन त्याची कसून चौकशी केली असता त्याच्याकडे तीन दुचाकी चोरीच्या जप्त करण्यात आले आहेत. त्याचे नाव साईनाथ मारुती मकलवाड रा. धर्माबाद असे असून तो सध्या धर्माबाद पोलिसांच्या कोठडीत आहे. त्याने धर्माबाद आणि उमरी पोलीस ठाण्याच्या हद्दीत गुन्हे केल्याची कबुली दिली आहे.